वाचा-:१) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र एसआरव्ही/१०९५/प्रक.१/९५/१२ दि.८/६/१९९५.
२) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र वेतन /११९९/प्रक.२/९९/सेवा-३ दि.२० जुलै २००१.
३) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र वेतन /१९९९/प्रक.२/९९/सेवा-३ दि.३ ऑगष्ट २००१.
४) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र वेतन /२०००/प्रक.१०/९९/ सेवा-३ दि. १० सप्टेंबर २००७.
५) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र वेतन /११०६/प्रक.७०/ सेवा-३ दि. ३१ ऑगष्ट २००९.
६) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र वेतन /११०९/प्रक.४३/ सेवा-३ दि. १५ ऑक्टोबर २००९.
७) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र वेतन /११०९/प्रक.१/ सेवा-३ दि. १५ ऑक्टोबर २००९.
७) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र वेतन /११०९/प्रक.४४/ सेवा-३ दि. १ एप्रिल २०१०.
८) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र वेतन /११०९/प्रक.४४/ सेवा-३ दि. ५ जुलै २०१०.
९) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र वेतन /११०९/प्रक.४४/ सेवा-३ दि. ५ जुलै २०१०.
१०) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्रक क्र आश्वप्र-१०१६/प्रक.५८/२०१६/सेवा-६,दि. १३ जून २०१६.
११) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र वेतन /११११/प्रक.३/ सेवा-३ दि. ०१ जानेवारी २०१९.
१२) वित्त विभागाचे परिपत्रक क्र.उन्नाव-२०१९/प्र.क्र.२७/२०१९/सेवा-३/दि.३१/०८/२०१९.
१३) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र वेतन /११११/प्रक.३/ सेवा-३ दि. ०२ मार्च, २०१९.
१४) कार्यासन अधिकारी महाराष्ट्र शासन सार्व.बांध. विभाग पत्रक न्यायाप-२०१७/प्र.क्र.९७/सेवा-३, दि.३१ जुलै, २०२०.
१५) आश्वासित प्रगती योजना (पहिला लाभ सुधारीत करणे) संदर्भात कार्यालयीन मंजूर टिपणी दि. 19/05/२०२२.

---

आदेश

जाक्र जजिप/बांध/आस्था-१/आरआर/ 76 /२०२२.
बांधकाम विभाग जिल्हा परिषद जळगाव,
दिनांक 19 / 5 /२०२२.

ज्याअर्थी, गट क व ड मधील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने असलेली कुंठीतता घालविण्यासाठी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१/९५/१२, दिन०८/०६/१९९५अन्वये अंमलात आलेली कालबध्द योजना बंद करुन त्याऐवजी महाराष्ट्र शासन
वित्त विभागाकडल शासन निर्णय क्र वेतन/११०९/प.क्र.४४/ सेवा-३/ मंत्रालय मुंबई-३२ यांचेकडील शासन निर्णय दि.२०/०७/२००१ अन्वये सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना लागू करण्यात आलेली आहे. तसेच आता महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.वेतन-११०९/प्र.क्र.४४/सेवा-३, दि. १ एप्रिल २०१० अन्वये शासन निर्णय दिनांक २० जुलै २००१ नुसार कार्यान्वीत असलेली सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना सुधारित स्वरुपात यापुढे "सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना" या नावाने दि.०१/१०/२००६ पासून अमलात आलेली आहे. सदरील योजना ही कमाल वेतन बॅन्ड रु.१५६००-३९१०० अधिक ग्रेड वेतन रु.५४००/- पर्यंत ग्रेड वेतन घेणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना लागू केलेली आहे. तसेच सातव्या वेतन आयोगानुसार तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना ही वेतन मॅट्रीकमधील वेतनस्तर एस-२० वेतन घेणाऱ्या(सहाव्या वेतन आयोगातील वेतन बॅन्ड रु.१५६००-३९१०० अधिक ग्रेड वेतन रु.५४००/- या वेतन संरचनेशी समकक्ष) कर्मचारी/अधिकारी यांना सदर योजना अनुज्ञेय करण्यात आलेली आहे. ही योजना जि.प.कर्मचाऱ्यांनी लागू आहे म्हणून जिल्हा परिषद, जळगांव अंतर्गत बांधकाम विभागाचे अधिनस्त कार्यरत असणाऱ्या राजपत्रित अधिकारी (दर्जा लागू असलेले) शाखा अभियंता/सहा.अभि.श्रेणी-२ यांना पदोन्नतीची संधी उपलब्ध न झाल्याने त्यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना अंतर्गत शाखा अभियंता पदावर १०/१२ वर्ष सेवा पूर्ण झालेल्या शाखा अभियंता यांना त्यांचे वरिष्ठ उपअभियंता पदाची (६ वा वेतन आयोग) वेतनश्रेणी-१५६००-३९१००/-ग्रे.पे.५४००/- व (७ व्या वेतन आयोग) वेतन संरचना वेतनमॅट्रीक एस-२० (५६१००-१७७५००) अनुज्ञेय ठरते.

त्याअर्थी, उक्त शासन निर्णयातील विहित तरतुदीच्या अधीन राहून मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद , जळगांव, मला प्रदान असलेल्या अधिकाराचा वापर करुन शाखा अभियंता पदावरील नियमित सेवा झालेल्या खालील शाखा अभियंता यांना पदोन्नती साखळीतील उपअभियंता या पदाची वेतन संरचना (शाखा अभियंता दर्जा नंतर पहिला लाभ) वरिष्ठ वेतन संरचना ( ६वा वेतन आयोग) वेतनश्रेणी-१५६००-३९१००/-ग्रेड पे.५४००/-व (७ व्या वेतन आयोग) वेतन संरचना वेतनमॅट्रीक एस-२० (५६१००-१७७५००) त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या (रकाना क्र.६ मध्ये नमूद केलेल्या) दिनांकापासून खालील नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूर करीत आहे.

| अ. क्र | शाखा अभियंता यांचे नांवे | कार्यरत असलेले कार्यालय | कनिष्ठ अभियंता पदी नियुक्तीचा दिनांक | शाखा अभियंता पदावर नियुक्ती चा दिनांक | सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत शा.नि.दि.०२ मार्च, २०१९ अन्वये वरिष्ठ वे.श्रे. मंजूर (लागू) केल्याचा दिनांक (शा.अभि.दर्जा नंतर प्रथम लाभ) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री.नितीन अशोक घोडके, शाखा | पंचायत समिती, जामनेर | ०१/०४/१९९२ | ०१/०४/२००२ | ०१/०४/२०१४ |

अटी व शर्ती-:

१) सुधारीत सेवांतर्गत आश्वासी प्रगती योजना लागू करण्यात आल्यामुळे जबाबदारी मध्ये वाढ होत नसली तरी महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ चे नियम ११(१)नुसार वेतननिश्चीती लागू करण्यात यावी व वेतननिश्चीतीसाठी नियमानुसार विकल्प अनुज्ञेय राहील. मात्र वेतननिश्चीतीचा मिळालेला हा लाभ त्या श्रेणीत कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यानंतर पुन्हा देय होणार नाही.

२) सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेंतर्गत पदोन्नती मिळाली तरी संबंधीत कर्मचा-याचे नाव सध्या कार्यरत आहे त्या कर्मचारी संवर्गातील जेष्ठता सूचिमध्येच राहील .

३) उपरोक्त कर्मचा-यांची वेतन निश्चीती करतांना महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील निर्णय क्र वेतन११०९/प्र.क्र.४४/सेवा ३/दि. १/४/२०१० व ०२/०३/२०१९ च्या निर्णयान्वये संबधीत कर्मचारी प्रत्यक्ष पदोन्नतीस अपात्र ठरला अथवा त्यांनी पदोन्नती नाकारली तर कर्मचा-याला लागू करण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील व अशा लाभाची वसूली एक रकमी करण्यात येईल. सदर वसूलीची संपूर्ण जबाबदारी संबधीत आस्थापना नियंत्रण अधिका-यांची राहील. या आदेशाद्वारे मान्य करण्यात आलेल्या वेतनश्रेणीची वेतननिश्चिती ची पडताळणी अर्थ विभागाकडून केल्या शिवाय कोणतेही लाभ संबधितास अदा करणेत येवू नयेत. तसेच **त्या प्रदानामध्ये ज्यादा अदाई झाल्यास या बाबत संबधितांकडून भविष्यात वसूली करण्यात येईल असे हमीपत्र (बंधपत्र) संबधिताकडून लिहून घेणे बंधनकारक आहे.** सदर बंधपत्र घेवून त्याची प्रत संबधितांच्या मूळ सेवापुस्तकास लावून एक प्रत आस्थापना कडेस जतन करण्यात यावी.

४) सुधारीत सेवांतर्गत प्रगती योजना दि.१ ऑक्टोबर २००६ पासून लागू राहील परंतु १ ऑक्टोबर २००६ ते ३१/३/२०१० या कालावधी पर्यंत काल्पनिकरित्या वेतननिश्चीती करुन प्रत्यक्ष लाभ दि.१ एप्रिल २०१० पासून किंवा कर्मचा-याचे नावासमोर दर्शविलेल्या तारखेपासून देण्यात येईल. पात्र थकबाकी अनुज्ञेय राहणार नाही.

५) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील दि. २५ जानेवारी १९९९ च्या अधिसूचनेनुसार व शासन निर्णय क्र प्रशिक्षण/२०००/प्र.क्र-५//२००१/३९ दि.२० जूलै २००१, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील संप्रनि-२००२/ प्र.क्र.१४/०२/१२ दि.२ सप्टेंबर २००३ च्या निर्णयान्वये ज्या कर्मचा-यांचे वय ५० वर्षे पूर्ण झालेले आहे अशा कर्मचा-यांना परिक्षेतून सूट होण्याच्या अटीवर सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत योजनेंतर्गत दुसरा लाभ मंजूर करण्यात येत आहे.

६) या योजनेखाली पात्र कर्मचा-यांना त्यांच्या संपूर्ण सेवाकालावधीत कमाल दोन वेळा पदोन्नतीच्या पदाची वेतन संरचना मंजूर करण्यात येईल. तथापी तीन किंवा त्यापेक्षा जास्त पदोन्नती मिळालेल्या कर्मचा-यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय ठरणार नाही. या संदर्भात संबधीत कार्यालय प्रमुखांनी कर्मचा-यांच्या मुळ सेवा पुस्तकाची पडताळणी करुन लाभ अनुज्ञेय करावा.

७) या आदेशाव्दारे मान्य करण्यात आलेल्या वेतनश्रेणीची वेतननिश्चिती ची पडताळणी अर्थ विभागाकडून केल्या शिवाय कोणतेही लाभ संबंधीतास अदा करणेत येवू नयेत तसेच त्याप्रदानामध्ये ज्यादा अदाई झाल्यास या बाबत संबंधीताकडून भविष्यात वसुली करण्यात येईल असे हमीपत्र (बंधपत्र) संबंधीताकडून लिहून घेणसे बंधनकारक आहे. सदरहु सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेच्या लाभासंदर्भात शासनाकडून सुधारीत आदेश प्राप्त झाल्यास होणा-या दुरुस्तीनुसार व वेतन पडताळणी पथकाकडून तपासणीच्या अधीन राहून वेतन निश्चीतीमध्ये बदल झाल्यास जादा अदा होणारे वेतन व भत्ते व तत्सम फरकाची रक्कम वसूल करण्याच्या अटीवर सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेंतर्गत शाखा अभियंता दर्जा नंतर दुसरा लाभ लागु करण्यात येत आहे.

८) **महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.वेतन-१११९/प्र.क्र.३/सेवा-३, दि.०२ मार्च, २०१९ च्या तरतुदी नुसार सदर लाभ मंजूर करण्यात येत असून सदर शासन निर्णयातील तरतुदींनुसार ही योजना दिनांक ०१/०१/२०१६ पासून अमलात आलेली असल्याने या योजनेखाली लाभ हा दि.०१/०१/२०१६ पासून अनुज्ञेय होईल.**

९) तसेच सातव्या वेतन आयोगाची अधिसुचना दिनांक ३०/०१/२०१९ नुसार वित्त विभागाचे स्पष्टीकरण दिनांक २०/०२/२०१९ मधील ७.८ मधील तरतुदीनुसार दि.१ जानेवारी २०१६ ते दि.३१ डिसेंबर २०१८ या कालावधीत शासकिय कर्मचाऱ्यास पदोन्नती मिळाली असेल आणि त्याने पदोन्नतीच्या दिनांकापासुन पदोन्नती पुर्वीच्या पदाची सुधारित वेतन संरचना स्वीकारण्याचा तसेच पदोन्नतीच्या दिनांकापासुनच पदोन्नतीच्या पदावरील वेतननिश्चिती करण्याचा विकल्प दिला असेल तर, अशा प्रकरणी पदोन्नतीच्या दिनाकांस प्रथमतः पदोन्नतीपुर्वीच्या पदाची ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतन संरचना ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित करण्यात यावी. तद्नंतर पदोन्नतीच्या पदावरील त्याची वेतननिश्चिती पदोन्नतीच्या पदाच्या सुधारित वेतन संरचनेतच (७ व्या वेतन आयोगाच्या) करण्यात यावी. शासन निर्णय दि.०२/०३/२०१९ मधील तरतुदीनुसार तंतोतंत अमलबजावणी करण्यात यावी.

सदरचे आदेश मा.न्यायालयाचे तसेच शासनाचे निर्देशानुसार व या कार्यालयाने यापुर्वी वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे अधिन आहेत. तसेच शासनाने विहित केलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे व वेळोवेळी विहित करुन दिलेल्या/देण्यात येणाऱ्या परीक्षा, प्रशिक्षण विहित मुदतीत उत्तीर्ण होणे सर्व संबधितांना बंधनकारक राहील. तसेच याबाबतची शासन नियमातील तरतुदी व धोरणात वेळोवेळी होणा-या बदलांचे अंतिम निर्णयाचे अधीन राहून सदरचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर आदेशाची नोंद सर्व संबंधितांचे मुळ सेवापुस्तकात घेण्यांत येवून आदेशाची शासन नियमानुसार काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

डॉ.पंकज आशिया(भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद जळगाव

प्रति,

१) श्री.नितीन अशोक चोडके, शाखा अभियंता यांना त्यांचे कार्यालयामार्फत रवाना.

<u>प्रत कार्यवाहीसाठी</u>

१) गटविकास अधिकारी पंचायत समिती, जामनेर जि.जळगाव.
२) उपविभागीय अभियंता जि.प.बांधकाम उप विभाग,जामनेर जि.जळगांव.

<u>प्रत माहिती व कार्यवाहीसाठी रवाना.</u>

१) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.) जि.प. जळगाव.
२) मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प. जळगाव.
३) कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग जिल्हा परिषद जळगाव.
४) समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद जळगाव.

डॉ.पंकज आशिया(भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद जळगाव

वाचा-:१)महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र एसआरव्ही/१०९५/प्रक्र.१/९५/१२ दि.८/६/१९९५.
२)महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र एसआरव्ही/१०९५/प्रक्र.१३/९५/१२ दि.८/६/१९९५.
३) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र वेतन /११९९/प्रक्र.२/९९/सेवा-३ दि.२० जुलै २००१.
४) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र वेतन /२०००/प्रक्र.१०/११/ सेवा-३ दि.३ ऑगस्ट २००१.
५) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र वेतन /११०९/प्रक्र.३०/ सेवा-३ दि. २० सप्टेंबर १००७.
६) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र वेतन /११०९/प्रक्र.४३/ सेवा-३ दि. ३१ ऑगस्ट १००९.
७) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र वेतन /११०९/प्रक्र.१/ सेवा-३ दि. १५ ऑक्टोबर १००९.
८) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र वेतन /११०९/प्रक्र.४४/ सेवा-३ दि. १ एप्रिल २०१०.
९) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र वेतन /११०९/प्रक्र.४४/ सेवा-३ दि. ५ जुलै २०१०.
१०) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्रक क्र आयो-१०१६/प्रक्र.५८/१०१६/सेवा-३ दि. १३ जून२०१६.
११) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्रक क्र आयो-१०१६/प्रक्र.५८/सेवा-३ दि. १३ जून २०१६.
१२) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र वेतन-११२१/प्रक्र.३/सेवा-३ दि. ०२ जानेवारी २०१९.
१३) वित्त विभागाचे परिपत्रक क्र.उन्याप्र-२०१९/प्र.क्र.१७/२०१९/सेवा-३ दि.२१/८/२०१९.
१४) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र वेतन-२११९/प्रक्र.३/सेवा-३ दि. ०१ मार्च २०१९.
१५)कार्यासन अधिकारी महाराष्ट्र शासन सार्व.बांधकाम विभाग पत्र क्र न्यायाप्र-२०२०/प्र.क्र.-१७/सेवा-३ दिनांक-२१ जुलै २०२०.
१६) आश्वासीत प्रगती योजना (पहिला लाभ सुधारीत करणे) संदर्भात कार्यालयीन मंजूर टिपणी दि.- १ / २ /२०२१.

---

आदेश

जाक्र जजिप/बांध/आस्था-१/आरआर/६१/२०२१
बांधकाम विभाग जिल्हा परिषद जळगाव
दिनांकः- १४/ २ /२०२१

ज्याअर्थि, गट क व ड मधील कर्मचा-यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने असलेली कुंठितता घालविण्यासाठी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.एसआरव्ह-१०९५/प्र.क्र.१/९५/१२ दि.८/६/१९९५ अंमलात आलेली कालबध्द पदोन्नती योजना बंद करुन त्याऐवजी महाराष्ट्र शासन वित्त विभाग मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडील शासन निर्णय दि. २०/७/२००१ अन्वये सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना लागु करण्यात आलेली आहे,तसेच आता महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्र वेतन-११०९/प.क्र ४४/सेवा-३ दि.१ एप्रिल २०१०,अन्वये,शासन निर्णय दिनांक २० जुलै २००१ नुसार कार्यान्वीत असलेली सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना सुधारीत स्वरुपात यापुढे **"सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना "** या नावाने दि-०१/१०/२००६ पासून अमलात आलेली आहे. सदरील योजना ही कमाल वेतन बॅन्ड रु.१५६००-३९१०० अधिक ग्रेड वेतन रु.५४००/- पर्यंत ग्रेड वेतन घेणा-या अधिकारी / कर्मचायांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना म्हणून लागू केलेली आहे. तसेच सातव्या वेतन आयोगानुसार तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना ही वेतन मॅट्रीकमधील वेतनस्तर एस-२० वेतन घेणा-या ( सहाव्या वेतन आयोगातील वेतन बॅन्ड रु.१५६००-३९१०० अधिक ग्रेड वेतन रु.५४००/- या वेतन संरचनेशी समकक्ष) कर्मचारी/अधिकारी यांना सदर योजना अनुज्ञेय करण्यात आलेली आहे.ही योजना जि.प. कर्मचाऱ्यांनाही लागु आहे म्हणुन जिल्हा परिषद,जळगांव अंतर्गत बांधकाम विभागाचे अधिनस्त कार्यरत असणा-या राजपत्रीत अधिकारी (दर्जा लागू असलेले) शाखा अभियंता/ सहा.अभि.श्रेणी-२ यांना पदोन्नतीची संधी उपलब्ध न झाल्याने त्यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना अंतर्गत शाखा अभियंता पदावर १० वर्ष सेवा पुर्ण झालेल्या शाखा अभियंता यांना त्यांचे वरिष्ठ उप अभियंता पदाची **(७ वा वेतन आयोग)वेतन संरचना वेतनमॅट्रीक एस.- २०(५६१००-१७७५००)** अनुज्ञेय ठरते,

त्याअर्थी उक्त शासन निर्णयातील विहित तरतूदिंच्या अधिन राहून मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,जळगांव,मला प्रदान असलेल्या अधिकाराचा वापर करुन शाखा अभियंता पदावरील नियमित सेवा झालेल्या खालील शाखा अभियंता यांना पदोन्नती साखळीतील उप अभियंता या पदाची वेतन संरचना **(शाखा अभियंता दर्जा नंतर पहिला लाभ) वरिष्ठ वेतन संरचना वेतनमॅट्रीक एस.- २० (५६१००-१७७५००)** त्यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या (रकाना क्र. ६ मध्ये नमूद केलेल्या ) दिनांकापासून खालील नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करीत आहे.

| अ. न | शाखा अभियंता यांचे नांवे | कार्यरत असलेले कार्यालय | कनिष्ठ अभियंता पदी नियुक्तीचा दिनांक | शाखा अभियंता पदावर नियुक्ती चा दिनांक | सेवांतर्गत आश्वासित प्रगति योजने अंतर्गत / शा.नि.दि.२ मार्च २०१९ अन्वये वरिष्ठ वेतन श्रेणी मंजुर (लागु) केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री.हेमंत कुमारसिंग पाटील | जि.प.बांधकाम उपविभाग,अमळनेर | २३/०२/२००६ | ०१/०४/२०११ | ०१/०४/२०२१ |

**अटी व शर्ती-:**

१०) सुधारीत सेवांतर्गत आश्वासी प्रगती योजना लागू करण्यात आल्यामुळे जबाबदारी मध्ये वाढ होत नसली तरी महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ चे नियम ११(१)नुसार वेतननिश्चीती लागू करण्यात यावी व वेतननिश्चीतीसाठी नियमानुसार विकल्प अनुज्ञेय राहील. मात्र वेतननिश्चीतीचा मिळालेला हा लाभ त्या श्रेणीत कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यावर पुन्हा देय होणार नाही.

११) सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेंतर्गत पदोन्नती मिळाली तरी संबधीत कर्मचा-याचे नाव सद्यः कार्यरत आहे त्या कर्मचारी संवर्गातील जेष्ठता सुचिमधेच राहील व त्यात कोणताही बदल होणार नाही .

१२) उपरोक्त कर्मचा-यांची वेतन निश्चीती करतांना महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील निर्णय क्र वेतन११०९/प.क्र-४४/सेवा-३/दि. १/४/२०१० व ०२/०३/२०१९च्या निर्णयान्वये संबधीत कर्मचारी प्रत्यक्ष पदोन्नतीस अपात्र ठरला अथवा त्यांनी पदोन्नती नाकारली तर कर्मचा-याला लागू करण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील व अशा लाभाची वसूली एक रक्कमी करण्यात येईल. सदर वसूलीची संपुर्ण जबाबदारी संबधीत आस्थापना नियंत्रण अधिका-याची राहील. या आदेशाद्वारे मान्य करण्यात आलेल्या वेतनश्रेणीची वेतननिश्चिती ची पडताळणी अर्थ विभागाकडून केल्या शिवाय कोणतेही लाभ संबधीतास अदा करणेत येवू नयेत तसेच **त्याप्रदानामध्ये ज्यादा अदाई झाल्यास या बाबत संबंधीताकडून भविष्यात वसुली करण्यात येईल असे हमीपत्र (बंधपत्र) संबंधीताकडून लिहून घेणे बंधनकारक आहे.**सदर बंधपत्र घेवून त्याची प्रत संबंधीतांच्या मुळ सेवा पुस्तकात लावून एक प्रत आस्थापने कडेस जतन करण्यात यावी.

१३) दुसरा लाभ लागू करतांना सुधारीत सेवांतर्गत प्रगती योजनेत दि. १ ऑक्टोबर २००६ पासून लागू राहील परंतू १ आक्टोबर २००६ ते ३१/३/२०१० या कालावधी पर्यंत काल्पनिकरित्या वेतननिश्चीती करुन प्रत्यक्ष लाभ दि. १ एप्रिल २०१० पासून किंवा कर्मचा-याचे नावासमोर दर्शविलेल्या तारखेपासून देण्यात येईल मात्र थकबाकी अनुज्ञेय राहणार नाही.

१४) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील दि. २५ जानेवारी १९९९ च्या अधिसुचनेनुसार व शासन निर्णय क्र प्रशिक्षण/२०००/प्र.क्र -५//२००१/३९ दि.२० जुलै २००२, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील संप्रनि-२००२/प्र.क्र२४/०२/१२ दि.२ सप्टेंबर २००३ च्या निर्णयान्वये ज्या कर्मचा-यांचे वय ४५ वर्षे पुर्ण झालेले आहे अशा कर्मचा-यांना परिक्षेतून सूट होण्याच्या अटीवर सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत योजनेंतर्गत सदरील लाभ मंजूर करण्यात येत आहे.

१५) या योजनेखाली पात्र कर्मचा-यांना त्यांच्या संपूर्ण सेवाकालावधीत कमाल तिन वेळा पदोन्नतीच्या पदाची वेतन संरचना मंजूर करण्यात येईल.तथापी तीन किंवा त्यापेक्षा जास्त पदोन्नती मिळालेल्या कर्मचा-यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय ठरणार नाही. या संदर्भात संबधीत कार्यालय प्रमुखांनी कर्मचा-यांच्या मुळ सेवा पुस्तकाची पडताळणी करुन लाभ अनुज्ञेय करावा.

१६) सदरहु सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेच्या लाभासंदर्भात शासनाकडून सुधारीत आदेश प्राप्त झाल्यास होणा-या दुरुस्तीनुसार व वेतन पडताळणी पथकाकडून तपासणीच्या अधीन राहून/ लेखा परिक्षणाचे अधिन राहून वेतन निश्चीतीमध्ये बदल झाल्यास जादा अदा होणारे वेतन व भत्ते व तत्सम फरकाची रक्कम वसूल करण्याच्या अटीवर सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेंतर्गत दुसरा लाभ लागु करण्यात येत आहे.

**१७)महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र वेतन-११९९/प्रक्र.३/सेवा-३ दि. ०२ मार्च २०१९ च्या तरतुदी नुसार सदर लाभ मंजूर करण्यात येत असून सदर शासन निर्णयातील तरतुदी नुसार हि योजना दिनांक-०१/०१/२०१६ पासून अमलात आलेली असल्याने या योजनेखाली लाभ हा दि-०१/०१/२०१६ पासून अनुज्ञेय होईल.**

१८) तसेच सातव्या वेतन आयोगाची अधिसुचना दिनांक ३०/०१/२०१९ नुसार वित्त विभागाचे स्पष्टीकरण दिनांक २०/०२/२०१९ मधील ७.८ मधील तरतुदीनुसार दि.१ जानेवारी २०१६ ते दि.-३१ डिसेंबर २०१८ या कालावधीत शासकिय कर्मचाऱ्यास पदोन्नती मिळाली असेल आणि त्याने पदोन्नतीच्या दिनांकापासुन पदोन्नती पुर्वीच्या पदाची सुधारित वेतन संरचना स्वीकारण्याचा तसेच पदोन्नतीच्या दिनांकापासुनच पदोन्नतीच्या पदावरील वेतननिश्चिती करण्याचा विकल्प दिला असेल तर, अशा प्रकरणी पदोन्नतीच्या दिनांकास प्रथमतः पदोन्नतीपुर्वीच्या पदाची ६व्या वेतन आयोगातील असुधारित वेतन संरचना ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित करण्यात यावी. तद्नंतर पदोन्नतीच्या पदावरील त्याची वेतननिश्चिती पदोन्नतीच्या पदाच्या सुधारित वेतन संरचनेतच (७ व्या वेतन आयोगाच्या) करण्यात यावी. शासन निर्णय दि.०२/०३/२०१९ मधील तरतूदीनुसार तंतोतंत अमलबजावणी करण्यात यावी.

सदरचे आदेश मा.न्यायालयाचे तसेच शासनाचे निर्देशानुसार व या कार्यालयाने यापुर्वी वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे अधिन आहेत. तसेच शासनाने विहित केलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे व वेळोवेळी विहित करून दिलेल्या/देण्यात येणा-या परीक्षा (प्रशिक्षण) विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे सर्व संबंधितांना बंधनकारक राहील. तसेच याप्रकरणी शासन नियमातील तरतुदी व धोरणात वेळोवेळी होणा-या बदलांचे अंतिम निर्णयाचे अधीन राहून सदरचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर आदेशाची नोंद सर्व संबंधितांचे मुळ सेवापुस्तकात घेण्यांत येवून आदेशाची शासन नियमानुसार काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

डॉ.पंकज आशिया (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद जळगाव

कार्यकारी अभियंता
बांधकाम विभाग,जि.प.जळगांव

प्रति, सोबत : मुळ सेवा पुस्तक

१)श्री हेमंत कुमारसिंग पाटील,शाखा अभियंता यांना त्यांचे कार्यालय मार्फत रवाना.

**प्रत कार्यवाहीसाठी**

१) गटविकास अधिकारी पंचायत समिती,अमळनेर- जि.जळगाव.

२) उपविभागीय अभियंता जि.प.बांधकाम उपविभाग -अमळनेर- जि.जळगांव. / भुसावळ

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी रवाना.**

१) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.) जि.प. जळगाव.

२) मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प. जळगाव,

३) कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग जिल्हा परिषद जळगाव

४) समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद जळगाव.

डॉ.पंकज आशिया (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद जळगाव

कार्यकारी अभियंता
बांधकाम विभाग,जि.प.जळगांव

मुळ सेवा पुस्तक मिळाले.

22-2-22